वर्ष : १४ ❑ अंक : ३

सौर फाल्गुन, शके १९३६ (फेब्रुवारी, २०१५)

वार्षिक वर्गणी : ₹ ३०

पर्यावरणाशी कृतिशील नातं

# गतिमान ☯ संतुलन

संपादक : दिलीप कुलकर्णी

**भूमिका**

'निसर्गस्नेही जीवनशैली' आणि 'पर्यावरणस्नेही विकासनीती' ह्यांचा पुरस्कार करणारं, त्या दृष्टीनं विचार आणि कृति-कार्यक्रम पुढे ठेवणारं हे माध्यम आहे. आत्मपरिवर्तनाच्या ह्या प्रयत्नांत आपणही सहभागी व्हा आणि इतरांनाही सहभागी करून घ्या.

## अरेरे! आम्ही फक्त 'मार्केट'!

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ओबामा हे प्रजासत्ताक-दिनाचे प्रमुख अतिथी म्हणून नुकतेच दिल्लीला येऊन गेले. अमेरिकेला भारताची मैत्री किती आवश्यक वाटते, हेच ह्या भेटीवरून सिद्ध झालं. दोन्ही देशांच्या नेत्यांनी ह्या मैत्रीची आवश्यकता प्रतिपादित केली.

भारताला अमेरिकेशी मैत्री हवी असणं हे स्वाभाविक म्हटलं जाईल; कारण, भारत हा विकसनशील देश आहे. विकसित होण्यासाठी त्याला अमेरिकेसारख्या राष्ट्राची अनेक प्रकारची मदत हवी असते. दोन मुख्य गोष्टी ज्या हव्या असतात, त्या म्हणजे आधुनिक तंत्रज्ञान आणि भांडवल. अमेरिकी उद्योगांना (ज्यांना 'बहुराष्ट्रीय उद्योग' असं म्हणण्याची प्रथा आहे) इकडे विस्तारासाठी वाव दिला की, ते भांडवल-गुंतवणूकही करतात, आणि आधुनिक तंत्रज्ञानही घेऊन येतात. हे होण्यासाठी अमेरिकेबरोबरची मैत्री आवश्यक आणि उपयुक्त ठरते. शिवाय, अमेरिका हा मोठा आयातक असल्यानं, मैत्रीचा आधार घेऊन अनेक वस्तूंची निर्यात तिकडे होऊ शकते. भारताला सध्या 'विकासा'साठी ह्या सर्व बाबींची नितान्त आवश्यकता असल्यानं त्यानं अमेरिकेशी मैत्री करणं, असलेली वाढवणं हे स्वाभाविकच आहे.

पण, अमेरिकेला भारतबरोबर मैत्री का हवी आहे? तो काही 'मैत्रीसाठी वाटेल ते' असं म्हणणारा देश नाही. त्याचा भलाथोरला फायदा असेल; त्याचे हितसंबंध जपले जात असतील, तरच तो मैत्री करतो. त्या हितसंबंधांना धक्का पोचताच त्या राष्ट्राला चिरडून टाकण्यास अमेरिका मागे-पुढे पाहत नाही. ह्याचाच अर्थ असा की, भारताशी मैत्री करण्यामागे, ती हवी असण्यामागे अमेरिकेचाही काही स्वार्थ आहे.

हा स्वार्थ कोणता हे समजणं हे काही फारसं अवघड नाही. अमेरिकी उद्योगांना विस्ताराला वाव हा त्याचा एक भाग; अन् अमेरिकी वस्तूंना भारतीय बाजारपेठ उपलब्ध होणं हा दुसरा. मधल्या मंदीनंतर अमेरिका अजूनही पुरती सावरलेली नाही. स्थानिक बाजारपेठेतली मागणी वाढत नसल्यानं वेगानं वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांची अमेरिकेला आज गरज आहे. चीन भारतापेक्षाही वेगानं वाढतोय; पण, अमेरिकी डाळ तिकडे शिजणं अवघड आहे. म्हणून मग उरला भारत. अन् अमेरिकेचं स्वागत करायला आम्ही तर कायमच हातात हार-तुरे घेऊन उभे असतो. इथली मलई-स्तरामधली जी १०-१५% लोकसंख्या आहे, ती तर मनानं आणि आचरणानं अमेरिकीच आहे. तिला सगळं काही 'डिट्टो अमेरिकेसारखं' हवं असतं. (अर्थात, 'सगळं काही' म्हणजे 'उपभोगण्याचं' सर्व काही : स्वच्छता, शिस्त, कार्यशैली नव्हे.) हा एक प्रचंड उपभोगवादी आणि अपव्ययी समाज भारतात आयता तयार आहेच. भारताचा आणखी 'विकास' होऊन ह्या मलई-स्तराची जाडी २५-३०% झाली की, अमेरिका खूष! हे एक तृतीयांश भारतीय म्हणजे अमेरिकेएवढी लोकसंख्या झाली. त्यांच्या रूपानं अमेरिकेला आणखी एक अमेरिका विस्तारासाठी उपलब्ध होणार आहे. अमेरिकेला भारताशी मैत्री हवी आहे ती ह्या 'मार्केट'साठी. मंदीतून वर येण्यासाठी अमेरिकेला ह्या 'मार्केट'ची फार मोठी गरज आहे!

अमेरिकेचं ठीक आहे : तिचं ध्येयच उपभोगवाढ, उत्पादनवाढ, GDP-वाढ, व्यापारवाढ हे आहे. तिच्यापाशी भवितव्याचा विचारच नाही : ना माणसाच्या, ना पर्यावरणाच्या. पण आम्ही?—ज्या गोष्टीचा दीर्घकालीन हितासाठी इथे सातत्यानं निषेध केला गेला, तेच आमचं 'जीवनध्येय' बनून जावं? मानव-जीवनाचा अत्यंत व्यापक, सर्वंगीण असा विचार करून 'जाणिवेचा विस्तार' हे ध्येय इथे सर्वांपुढे ठेवलं गेलं. उपभोग संयमित असले पाहिजेत, ही त्यासाठीची व्यावहारिक अट होती. अशा संयमित उपभोगांतूनच उत्पादनाची पातळी धारणाक्षम राहू शकते, हे व्यावहारिक शहाणपणही त्यामागे होतं.

अमेरिकेपाशी हा विचार नाही, हे ध्येय नाही अन् हे व्यावहारिक शहाणपणाही नाही. 'संसाधनं आणि ऊर्जांचा अतिरेकी वापर करून उत्पादन-उपभोग वाढते ठेवणं' एवढंच तिला ठाऊक आहे. त्या संसाधनांसाठी आणि ऊर्जांसाठी ती पृथ्वीवरच्या कोणत्याही देशाला लुबाडायला-बेचिराख करायला मागेपुढे पाहत नाही. 'कालच्या पेक्षा आज जास्त फायदा' हे तिचं ध्येय आहे. निसर्गाच्या धारणेशी तिला काडीचंही देणं-घेणं नाही.

दुर्दैव हे आहे की, आमच्यापाशी ते उच्च ध्येय, दूरचा विचार आणि व्यावहारिक शहाणपण असूनही आम्ही त्याला तिलांजली देऊन अमेरिकी बनलो आहोत. १२ जानेवारीला विवेकानंदांच्या नावानं कुणीही कितीही गळे काढले, तरी आम्ही आता 'अमृताचे पुत्र' वगैरे काहीही नाही. आम्ही आहोत फक्त 'मार्केट'! बाजारपेठ! अमेरिकी (आणि अन्यही) उद्योगांनी इथे यावं, इथली संसाधनं-ऊर्जा संपवत उत्पादन करावं-विकावं, आणि आम्ही आमच्याच बांधवांचं आणि निसर्गाचं शोषण करून मिळालेल्या पैशांनी ते सारं विकत घ्यावं-उपभोगावं. लूट आणि हानी इथल्या निसर्गाची—फायदा जाणार त्यांच्या देशात. एक वसाहतवाद अमेरिकेचा भारतावर; दुसरा 'क्रीमी लेअर'चा इथल्याच दरिद्री लोकांवर आणि निसर्गावर.

ते 'लबाड लांडगं ढ्वांग करतंय' गाणं आहे नं, तसा हा प्रकार आहे. लांडगा निघालाय शेळीशी लग्न करायला; अन् शेळीही आपखुषीनं त्याच्याशी पाट लावायला तयारच आहे. 'लांडगा तुला खाईल' हे शेळीला सांगूनही समजत नसेल, तर सांगणाऱ्यानं आणखी काय करावं?

## 'एकला चलो रे'

वरच्या प्रश्नाचं उत्तर रवींद्रनाथांच्या ह्या सुप्रसिद्ध काव्यपंक्तीत आहे. गेला महिनाभर मी रोज ही पंक्ती म्हणून स्वत:ला समजावत आहे. संदर्भ अमेरिका-भारत मैत्रीचा नाही : थोडासा वेगळा आहे. पान ४वरच्या कोऱ्या चौकोनाचा.

ग.सं.च्या डिसेंबरच्या अंकात 'काय सोडणार अभियान' ह्या विषयीचा एक सविस्तर लेख छापला होता. 'आपले उपभोग अतिरेकी झाले आहेत, त्यापायी निसर्गाची खूप हानी होत आहे; ती कमी करण्यासाठी १ जानेवारीपासून काही तरी सोडू या' असा त्याचा सारांश होता. 'आपण काय सोडलं' हे वाचकांनी ग.सं.कडे पत्रानं कळवावं अशी सूचनाही त्या लेखात केली होती. गेल्या अंकातील संपादकीयाच्या शेवटी ह्या विषयाची एक स्मरणार्थ नोंदही छापली होती.

ग.सं.चे साधारण १६०० वर्गणीदार आहेत. ते सर्व जण ह्या विषयाबाबत गंभीर असतील असं नाही. पण सामान्यत: एक चतुर्थांश जण तरी ग.सं. गंभीरपणे घेतात असा माझा अंदाज होता. त्यानुसार ३०० ते ४०० जणांकडून तरी प्रतिसाद येईल अशी माझी अटकळ होती. आज १ फेब्रुवारीची स्थिती काय आहे हे पृ.४वरील चौकटीवरून कोणाच्याही लक्षात येईल.

आपल्या असंख्य उपभोगांपैकी चैनीची, आरोग्याला घातक अशी केवळ एक बाबही सोडण्याची कुणाची तयारी नाही! निसर्गाची धारणा होण्यासाठी अशा शेकडो गोष्टी सोडण्याची तातडीची आवश्यकता असताना एक—फक्त एक—गोष्टही सोडण्याचा प्रयत्न कुणी करू इच्छित नाही, हे वास्तव आहे.

पण एक सांगतो : ह्या वास्तवानं मी मुळीच निराश झालेलो नाही. हे वास्तव बदलण्याचा प्रयत्न करणं हेच तर माझं जीवितकार्य आहे, आणि मी ते यथाशक्ती करतच राहणार आहे.

सुमारे २ वर्षांपूर्वी मी 'चळवळ आणि साधना' ह्या शीर्षकाचं संपादकीय लिहिलं होतं. अनेकांचा पाठिंबा, सक्रिय सहभाग असेल, तरच 'चळवळ' उभी राहू शकते. 'काय सोडणार अभियान' उभंच राहिलं नाही ह्यामागे अशा पाठिंब्याचा, सहभागाचा अभाव आहे. तो मिळवण्यात मी कमी पडलो, हे तर दिसतंच आहे. पण, चळवळ ही अशा प्रकारे दुसऱ्यांवर अवलंबून असल्यानं तो प्रकार बेभरवशाचाच असतो. म्हणूनच, त्या संपादकीयात म्हटल्याप्रमाणे मला 'साधना' हा प्रकार आवडतो. 'इतरांनी काय सोडलं; सोडलं की नाही' ह्या कशाचाही माझ्या साधनेशी संबंधच नाही. निसर्गाची आणि आरोग्याची हानी करणाऱ्या गोष्टी एकेक करून सोडत जाणं ही माझी साधना आहे. साथीला इतर कोणी असो वा नसो : माझी साधना त्यानिरपेक्ष चालूच राहील. चळवळ उभी राहो न राहो : मला त्यानं काहीच फरक पडत नाही! मी आणि पौर्णिमा एकमतानं, एकदिलानं ३० वर्षं ही साधना करतच आहोत.

'एकला चलो रे' ह्या गीतात रवींद्रनाथ हेच तर सांगतात ना!

*'स्वच्छ भारत अभियाना'च्या निमित्तानं लेखमाला*

**विकास, स्वच्छता आणि पर्यावरण | २**

## केंद्रीकरण आणि कचरा

**दिलीप कुलकर्णी**

*शहरं नावाची एक अत्यंत अनैसर्गिक व्यवस्था आपण जोवर चालवत आहोत, तोवर सेंद्रिय कचरा—विघटनक्षम असूनही—एक समस्याच बनून राहणार.*

गेल्या लेखांकात आपण पाहिलं की, निसर्गात फक्त सेंद्रिय द्रव्यांचीच निर्मिती होते आणि त्या संश्लेषित पदार्थांचं विघटन करून त्यांचं पुन्हा मूळ मूलद्रव्यांमध्ये विघटन/विश्लेषण करणारे सूक्ष्मजीव निसर्गात असतात.

आता प्रश्न असा की, असं जर आहे, तर, मग सेंद्रिय कचरा (ओला कचरा) ही देखील सध्या एक समस्या का बनली आहे? ती तर विघटनक्षम गोष्ट आहे.

—इथे मुद्दा येतो निसर्गाच्या मर्यादांचा. निसर्गातले सूक्ष्मजीव किती वेगानं काम करू शकतात ह्याला एक अपरिहार्य मर्यादा आहे. आपण समजा एखाद्याला म्हटलं की, 'तू १०० कि.मी. अंतर एका तासात पळून जा', तर ते शक्य आहे का? माणूस पळू शकतो हे खरं; पण, तो किती वेगानं पळू शकतो ह्याला एक अपरिहार्य मर्यादा आहे. धावण्याचा सरासरी वेग खूप प्रयत्नांनी वाढू शकेल हे मान्य केलं, तरीही तो ताशी १०० कि.मी. इतका कधीच होऊ शकणार नाही. सूक्ष्मजीव ज्या वेगानं सेंद्रिय कचऱ्याचं विघटन करू शकतात, त्यालाही अशीच एक मर्यादा आहे. सध्या आपण सेंद्रिय कचराही इतक्या वेगानं आणि इतक्या प्रचंड प्रमाणावर तयार करतो की, त्याचं विघटन करणं हे सूक्ष्मजीवांच्या आवाक्याबाहेरचं आहे.

इथे एखाद्याच्या मनात असा प्रश्न येईल की, निसर्गातली सेंद्रिय द्रव्यांची निर्मितीही जर मर्यादित वेगानंच होत असेल; आणि सर्व सेंद्रिय द्रव्यं जर अंतिमत: विघटित होत असतीलच; तर, सूक्ष्मजीवांचा विघटन करण्याचा वेग कमी कसा काय पडेल?

प्रश्न अगदी बरोबर आहे. निसर्गात संश्लेषण आणि विश्लेषण ह्या क्रियांचा वेग परस्पर-संतुलित असतो. पण, तो कायम समान, एकसारखा असतो, असं मात्र नाही. अनुकूल वातावरण असेल (उदा. पावसाळा), तेव्हा वनस्पतींकडून प्रकाश-संश्लेषण, किंवा प्राण्यांकडून मांसनिर्मिती मोठ्या प्रमाणावर होते. तर, सेंद्रिय द्रव्यं मोठ्या प्रमाणावर जमिनीवर पडली (उदा. बैल मरून पडला), की विश्लेषणाचं काम मोठ्या प्रमाणावर होतं. ते करणाऱ्या सूक्ष्मजीवांची लोकसंख्या तेवढ्या स्थानापुरती आणि तेवढ्या काळापुरती प्रचंड वाढून ते विघटनाचं काम तातडीनं पुरं करतात. म्हणजेच, एका विशिष्ट वेळेला, किंवा विशिष्ट ठिकाणी ह्या दोन क्रियांचा वेग समान नसतो. मात्र, दीर्घ कालावधीत त्या दोन्हींमध्ये एक संतुलन निश्चितपणे असतं.

मात्र, ह्या संतुलनासाठी आवश्यकता असते ती 'विकेंद्रीकरणा'ची. निसर्गाची रचना तशी असल्यानं सेंद्रिय कचऱ्याचं लवकर वा उशीरा विघटन होत राहतं.

ह्यात आणखी एक मुद्दा असा आहे की, विघटन जमिनीवर सगळीकडे होत राहतं. जिथे कुठे त्याज्य द्रव्यं पडतील (पाचोळा, शेण, मृतदेह) तिथेच ती विघटित होतात. त्यांची वाहतूक होत नाही. झाडांना वाढीसाठी ह्या मूलद्रव्यांची गरज पडत असल्यानं ती आपली मुळं सर्वदूर पसरवून त्यांना गोळा करण्याचं, शोषण्याचं काम करतात. म्हणजेच, जर हिरव्या वनस्पतींना त्यांचं अन्न उपलब्ध व्हायला हवं असेल, तर ते त्यांच्या मुळांच्या पसाऱ्याच्या आवाक्यात विघटित व्हायला हवं. थोडक्यात, विघटन आणि संश्लेषण ह्या क्रियांमध्ये सामीप्य (proximity) हवं.

निसर्गरचनेच्या ह्या पार्श्वभूमीवर मानवानं सध्या जी रचना निर्माण केली आहे तिच्याकडे पाहिलं, तर काय दिसतं?—

(पृष्ठ ३ वर)

# रामायणाचा पर्यावरणीय आशय ३

**सुरेश भागवत**

*रामायणाचा आशय पर्यावरणीयही आहे असं सुचवणारी ही लेखमाला : संयमित उपभोगाच्या जीवनशैलीचा पर्यावरणीय संदेश त्यातून कसा मिळतो हे प्रतीकात्मतेच्या दृष्टिकोणातून उलगडून दाखवणारी.*

साऱ्या पौराणिक कथांमध्ये असे दिसून येते की, सामर्थ्य संपादणे, अवध्यता-अजेयता मिळवणे, अजेय सामर्थ्याचा दर्प बाळगून साऱ्या जगास आपल्या भोगार्थ दास बनविणे ह्या क्रमाने असुरांचे जीवन पुढे सरकते. तोच जीवनक्रम रावणाचा व त्याच्या आधीन असुरवीरांचा होता. असुरांच्या जीवनक्रमात वर्णन येते ते स्वाभाविकपणे 'त्रिलोक त्रस्त झाले, त्राही त्राही करू लागले' असे असते. ह्या त्रस्ततेचा जो तपशील सर्व कथांमध्ये येतो, तो हूण, मोगल, अल्लाउद्दिन खिलजी, औरंगजेब ह्यांसारख्यांनी केलेल्या अत्याचारांप्रमाणे नाही. ह्या सर्वांनी 'कत्तली केल्या, गावे जाळली, संपत्ती लुटली, घरादारावरून गाढवाचे नांगर फिरविले, जिझिया वसूल केला.' असुरांच्या बाबतीत मात्र 'जंगले नष्ट झाली; अवर्षण आले; जलाशये व नद्या आटल्या; प्राण्यांच्या अस्थींचे, ऋषिमुनींच्या अस्थींचे पर्वत उभे राहिले; सारे भूतमात्र, सर्व लोकपाल त्रस्त झाले; इंद्राच्या पदास धोका निर्माण झाला,' अशा प्रकारचा तपशील येतो. इंद्राच्या प्रमुखत्वाने वरुण, अग्नी, इ. साऱ्या शक्ती, लोकपाल पार्यावरणिक सुस्थितीस जबाबदार असतात हे ध्यानी घेतले; तर असुरांच्या दुष्ट कारवायांच्या परिणामांचे स्वरूप पर्यावरण-विनाशक असते असे स्पष्ट होते. असुरांच्या अनिवार भोगलालसेमुळे पार्यावरणिक संकट उभे राहते, असाच ह्या साऱ्या कथांचा आशय असतो. किंबहुना गीतेमधील १६व्या अध्यायाचा नीट विचार केला, तर अमर्याद भोगप्रवणता आणि सामर्थ्याच्या दर्पापोटी साऱ्या जगास दासाच्या, भोगवस्तूच्या स्थानी मानणे ह्या प्रवृत्तीद्वारे पार्यावरणिक संकट उभे करणाऱ्या व्यक्तीस असुर, व त्याच्या गुणांना आणि वृत्तींना 'आसुरी गुणसंपदा' म्हटले आहे हे स्पष्ट होते. वाल्मीकी रामायणातही त्राटिकेकडून, विराधाकडून, कबंधाकडून व (रामायणमाहात्म्याच्या कथेमधील) राक्षस बनलेल्या सोमदत्त विप्राकडून अशाच प्रकारे 'वने उजाड झाली, योजनेच्या योजने भूभाग उजाड झाला' असे म्हटलेले आढळते. विरोचनाची कन्या सृष्टीचा नाश करू पाहते (पृथिवीम् हन्तुम् इच्छन्ति'). असुरांचा गुरु शुक्राचार्याची माता नियंत्याविना सृष्टीची इच्छा करते (अनिंद्रं लोकम् इच्छन्ति') असे वर्णन येते. दंडकारण्यात १००० राक्षसांसह श्रीरामावर आक्रमण करणाऱ्या 'खर' नावाच्या असुराने आपल्या अनुयायांचे वर्णन 'लोकहिंसाविहारी' असे केले आहे. युद्धकांडाच्या ३३व्या सर्गामध्ये 'सरमा' राक्षसीने रावणाचे वर्णन 'अयुक्त-बुद्धिकृत्येन सर्वभूतविरोधी' असे केले आहे. ह्या साऱ्या वर्णनांमध्येही पार्यावरणिक आशय आहे.

असुरांच्या कारवायांमुळे झालेल्या निसर्गाच्या विनाशाची वर्णने जशी येतात, तशीच असुर-विनाशानंतर निसर्ग समृद्ध झाल्याचीही वर्णने रामायणात येतात. ह्यावरून, असुरांची जीवनशैली आणि पर्यावरणाचा ऱ्हास किंवा उत्कर्ष ह्यांचा थेट संबंध सर्व पुराणांना आणि रामायणास मांडायचा आहे हे स्पष्ट होते. उदाहरणार्थ : (१) त्राटिकेविषयी स्त्री म्हणून दयाभाव न बाळगता 'गोब्राह्मणहितार्थाय' तिचा वध कर असे विश्वामित्रांनी सांगितले आणि तिच्या वधानंतर 'तस्मिन्नेव तदहनि' म्हणजे 'त्याच दिवशी' ते त्राटिकावन शापमुक्त होऊन रमणीय व समृद्ध झाले असा कथाभाग बालकांडाच्या सर्ग २५ व २६ मध्ये आहे. (२) 'सर्वलोकभयावह' इंद्रजिताचा लक्ष्मणाने वध केल्यानंतर 'जल स्वच्छ झाले, आकाश निर्मल झाले, ईश्वरशरण व्यक्तींनी निश्चिंतपणे-निर्भयपणे संचार करावा' असे वर्णन युद्धकांडाच्या सर्ग ९०.८८ मध्ये आहे. समर्थ रामदासांच्या 'आनंदवनभुवना'चे हे जणू प्राचीन रूप आहे. (३) सर्व असुरांचा विनाश करून वनवासातून परतलेल्या श्रीरामांना राज्याभिषेक झाल्यानंतर 'सारी पृथ्वी हिरव्यागार शेतांनी बहरली; वृक्ष सुदृढ मुळांचे, वर्षभर फुलणारे व फळणारे झाले; हवा सुखकारक व पर्जन्य इच्छेनुसार प्राप्त झाला' असे वर्णन युद्धकांडाच्या सर्ग १२८.१०३मध्ये आहे.

ह्या विवेचनावरून असुरांचे पर्यावरण-संहारक व्यक्तित्व स्पष्ट होते.

**सीता**

सीता ह्या संज्ञेस वैदिक साहित्यापासून एक अर्थपरंपरा आहे. भारतीय संस्कृति-कोशातील टिपणाप्रमाणे वैदिक साहित्यात सीता हे व्यक्तिनाम कृषीच्या अधिष्ठात्री देवतेस योजले गेले आहे, व एकदा ती सूर्यकन्या असल्याचा उल्लेख आहे. सूर्य आणि वनस्पतीजीवन (एकूण सारे जीवन) ह्यांचा कार्यकारणसंबंध लक्षात घेता 'कृषीची अधिष्ठात्री देवता' व 'सूर्यकन्या' ह्या दोन्ही संकल्पना परस्परांशी समरूप मानल्या पाहिजेत. वाल्मीकी रामायणामधील सीतेची जन्मकथा ही ह्या वैदिक संकल्पनेशी आणि सीता ह्या शब्दाच्या धात्वर्थाशीही संबंध राखून आहे. 'सीता' ह्या शब्दाचा अर्थ आहे : 'नांगराच्या फाळाने मातीत तयार केलेली खोल नळी—'तास'! रामायणामध्ये बालकांडात, अयोध्याकांडात आणि उत्तरकांडात अशी तीन वेळा, अनुक्रमे जनकाकडून, सीतेकडून व अगस्ती मुनींकडून सीतेची जन्मकथा आली आहे. तिन्ही वर्णनांचे अर्थ पाहता सीतेचे व्यक्तित्व कृषी, भूमीची सर्जनशक्ती, सर्जनकर्म ह्या साऱ्यांशी, म्हणजे पर्यावरणाशी, निगडित आहे हे ध्यानीं येते.

सीतेच्या दोन पूर्वजन्मांच्या कथाही रामायणात उत्तरकांडात आहेत. त्यांपैकी पहिल्या जन्मात ती 'वेदवती' नावाची 'वाङ्मयी' कन्या आहे. दुसऱ्या जन्माचे वर्णन 'कमल' ह्या प्रतीकाच्या साह्याने 'पद्मे समुद्भूता', 'पद्मसमप्रभा', 'कमलगर्भाभा' ह्या शब्दांत आहे. कमल हे स्त्रीतत्त्व, नवसर्जन, शाश्वत जीवन, शुद्ध ज्ञान, भूमी, इ.चे प्रतीक मानले गेले आहे. सारांश, सीतेचे तिन्ही जन्म अलौकिक आहेत. तिन्ही अशरीरी आहेत. पहिला 'वाङ्मयी' म्हणजे ज्ञानरूप, दुसरा 'कमल' प्रतीकाशी म्हणजे नवसर्जन, भूमी, भूमीकडून जीवोत्पादन व त्याआधारे शाश्वत जीवनाचे रूपातील, व तिसरा 'भूमिकन्या' म्हणून प्रत्यक्ष कृषीशी, सर्जनाशी संबंधित आहे. तिन्ही जन्मवृत्तान्तांमध्ये सीता ही शुद्ध ज्ञान, सर्जनशक्ती, शाश्वत-जीवन ह्या तत्त्वांचे प्रतीक आहे. तिन्ही जन्मांमध्ये काम-क्रोध-दर्प ह्यांची मूर्ती असलेल्या रावणाच्या भोगलालसेची ती शिकार झाली. अनिवार भोगलालसेमुळे नवसर्जन, जीवनाची शाश्वतता धोक्यात येते ह्याचेच हे प्रतीक होय. ह्या उलट, विश्वाचे स्थितितत्त्व विष्णू हाच सीतेचा योग्य पती होय. पहिल्या जन्मातील सीता (वेदवती) ही विष्णू हा पती मिळावा ह्यासाठी तप करीत असताना रावणाच्या नजरेस पडली. रावणाने केलेल्या अविनयामुळे वेदवतीने अग्निप्रवेश केला अशी कथा आहे. दुसऱ्या जन्मातही रावणाने तिचे अपहरण केले; परंतु, ती मृत्यूस कारण होईल ही भविष्यवाणी ऐकल्यावर त्याने तिला सागरात फेकून दिले. तिसऱ्या जन्मात सीतेने तिच्या पूर्वजन्मामधील इच्छेप्रमाणे श्रीरामांच्या रूपात भगवान विष्णू पती म्हणून प्राप्त केला आणि रावणाचा अंतही घडविला. शुद्ध ज्ञानरूप वेदवतीने स्थितितत्त्व अशा भगवान विष्णूंशी एकरूप होऊन, काम-क्रोध-दर्प, इ. आसुरी गुणसंपदेचा जर विनाश घडविला, भोगप्रवणतेची मर्यादा जर निश्चित केली, तर निसर्गाची सर्जनशक्ती, सर्जनकर्म आणि जीवनाची शाश्वतता अबाधित राहते असा बोध देणारे पर्यावरणीय व्यक्तित्व सीतेस लागले आहे. प्रतीकात्मता उलगडल्यावर ते स्पष्ट होते.

**श्रीराम**

रामायणाचे हे कथानायक आहेत. तथापि श्रीरामांचे चरित्र सांगण्याकरिता रामायणाची रचना नसून काम-क्रोध-दर्प-मद, इ.द्वारे सृष्टीचा विनाश करणाऱ्या असुरांचा विनाश करून, शाश्वत जीवनाचा मार्ग मोकळा करण्याचा श्रीरामांचा पराक्रम सांगण्याकरिता ती आहे. बालकांडाच्या चौथ्या सर्गात ह्या महाकाव्यास 'पौलस्त्य (रावण)-वध' असे नाव सुचविले आहे, त्यावरून रामायणकारांचे मानस स्पष्ट होते.

श्रीराम हे आदर्श राजा, आदर्श पुत्र, मर्यादापुरुषोत्तम होते, इ. वर्णन आपण जाणतो. येथे आपल्याला पर्यावरणाचा ऱ्हास किंवा उत्कर्ष, व त्यास कारणभूत जीवनविचार ह्या दृष्टीने त्यांचे व्यक्तित्व पाहावयाचे आहे. श्रीरामांचे समष्टी व सृष्टी ह्यांना समर्पित व्यक्तित्व सांगण्याकरिता रामायणकारांनी अध्यात्मपर शब्दयोजना केली आहे. उदाहरणार्थ, अयोध्याकांडाच्या पहिल्या सर्गात (१) भूतमात्राकरिता श्रीराम जणू ब्रह्मच होत; (२) विश्वाचे स्थितितत्त्व साक्षात विष्णूच होत; (३) अलौकिक पुरुषतत्त्वाचे आणि लौकिक पौरुषाचे सार जाणणारे एकमात्र साधुपुरुष होत; (४) धर्म-काम-अर्थ, इ.चे सारतत्त्व जाणणारे होत, अशा शब्दांत वर्णन आहे. ते साऱ्या दैवी गुणसंपदेचे निधी होत; एवढेच नव्हे, तर गीताप्रणीत 'विश्वपुरुष'समान ते होत असेही वर्णन युद्धकांडाच्या ११७व्या सर्गात आहे. अयोध्यानिवासी समाजाने वृक्षाचे रूपक वापरून 'धर्माचे सारतत्त्व जाणणारे श्रीराम हे सृष्टीचे मूळ होत व

*(पृष्ठ ३ वर)*

# भारताचं जागतिकीकरण : आघात आणि पर्याय ८

*उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण ह्या धोरणांना १९९१मध्ये प्रारंभ झाला. आता दोन दशकांनंतर कोणतं चित्र दिसतं? अर्थव्यवस्था, समाज आणि पर्यावरण ह्यांचं ह्या काळात काय झालं?*

*ह्या साऱ्याचा शोध घेऊन **असीम श्रीवास्तव** आणि **आशिष कोठारी** ह्यांनी लिहिलेल्या ग्रंथातील निवडक माहिती संकलित करून 'कल्पवृक्ष' ह्या संस्थेनं 'Globalization in India : Impacts and Alternatives' ही पुस्तिका २०१२मध्ये प्रकाशित केली आहे. तिचा **दिलीप कुलकर्णी** ह्यांनी केलेला हा मराठी अनुवाद.*

तिसरं संकट आहे उपजीविकेचं : रोजगाराचं. हवा, पाणी ह्यांविषयीची संकटं अधिकाधिक तीव्र बनत असताना; किंवा विविध परिसंस्थांची हलाखी वाढत असताना; किंवा नैसर्गिक संसाधनं आणि परंपरागत ग्राहक घटत चाललेले असताना शेतकरी, शिकारी, मच्छिमार, गुराखी, विविध बलुतेदार अशा परंपरेनं स्वयं-रोजगारांत असणाऱ्यांवरचा आघात तीव्रतर होत आहे. अशांच्या उपजीविकांची वा रोजगारांची किती हानी झाली आहे ह्याविषयीची सर्वंकष आकडेवारी उपलब्धच नाही. ही बाब किती दुर्लक्षित राहिलेली आहे, हेच ह्यावरून दिसून येतं.

ह्या संकटांचा विशेष दुष्परिणाम झाला आहे तो भटक्या जमातींवर. त्यांचे स्थलान्तराचे मार्ग उद्ध्वस्त झाले आहेत; त्यांची जीवनशैली आणि संस्कृती बदनाम झाली आहे, ते परिघावर फेकले गेले आहेत. त्यांची तरुण पिढी ही अनेक आकर्षणं आणि प्रभावांमुळे परंपरेपासून दूर जात आहे. भारताच्या मानववंशशास्त्रीय सर्वेक्षण संस्थेच्या अंदाजानुसार पशुपालकां-व्यतिरिक्त किमान २७६ भटके व्यावसायिक होते. त्यात शिकारी, फासेपारधी, कोळी, कारागीर, कथा-कथनकार, मनोरंजनकार, वैदू, आध्यात्मिक आणि धार्मिक प्रसारक, व्यापारी अशा अनेकांचा समावेश होतो. ह्यांपैकी बरेचसे व्यवसाय आता संकटात आहेत. कित्येक नामशेष झालेले आहेत वा मृत्युपंथाला लागलेले आहेत. उपजीविकेची ही साधनंच नाहीशी झाल्यानं अनेक जण असंघटित कामगार म्हणून असुरक्षित, कमी उत्पन्नाचं, प्रतिष्ठा नसलेलं, आणि शोषिताचं जिणं कसंबसं जगत आहेत. बरेच जण बेकारच आहेत. देशातल्या ४ कोटी भटक्या पशुपालकांची दैना ह्यापेक्षा वेगळी नाही.

**पर्यावरणाचा राष्ट्रीय नियोजनात समावेश झाला आहे का?**

'पर्यावरणाचं संरक्षण-संवर्धन करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे' असं मनमोहन सिंह म्हणाले होते. मुळात जे नष्ट झालं आहे, ते पुन्हा निर्माण करता येईल का (उदा. धरणांखाली बुडालेली, खाणीमुळे नाहीशी झालेली, वा उद्योगांसाठी तोडली गेल्यानं नष्ट झालेली लाखो हेक्टर वनं), हा प्रश्न बाजूला ठेवला; तरी जागतिकीकरणामुळे जो 'विकास' झाला, तज्जन्य समस्यांच्या समप्रमाणात पर्यावरण-रक्षणासाठीचा निधी वाढत गेला का, हे तरी निश्चितच विचारता येऊ शकेल. 'पर्यावरण' हा नियोजन-प्रक्रियेचा केंद्रबिंदू बनला का?

तसं पाहिलं तर, पर्यावरण आणि वन मंत्रालयाला मिळणारा निधी हा १९९०च्या दशकापासून सातत्यानं वाढत आहे. (१९९५-९६मधल्या ३७० कोटी रुपयांपासून २००९-१०मधल्या १५०० कोटी रुपयांपर्यंत) तथापि, एकूण अंदाजपत्रकातला त्याचा हिस्सा १%पेक्षाही कमीच राहिलेला आहे. २००४-०५पासून तर तो घटतच गेला आहे, आणि २००९-१०मध्ये त्यानं ०.३६% अशी नीचांकी पातळी गाठली आहे. १९९५ ते २०१० ह्या कालावधीत राष्ट्रीय अंदाजपत्रकात ५ पट वाढ झाली; पण, पर्यावरण आणि वन मंत्रालयाच्या अंदाजपत्रकात मात्र ४ पटच वाढ झाली. ह्यावरून हे स्पष्ट होतं की, सरकारला एकूणात अधिक पैसा उपलब्ध होत असूनही, पर्यावरण-रक्षणासाठी मात्र ते त्या प्रमाणात निधी देत नाही. अ-पारंपरिक ऊर्जास्रोतांसारख्या अन्य संबंधित क्षेत्रांच्या निधीतही विशेष अशी वाढ झालेली नाही.

सरकारतर्फे दरवर्षी एक 'आर्थिक सर्वेक्षण-अहवाल' प्रसिद्ध केला जातो. अर्थव्यवस्थेतील विविध बाबींविषयीचे कल त्यातून समजतात, आणि पुढील वर्षासाठीचं एक ढोबळ चित्र पुढे येतं. १९९०नंतर ह्या अहवालात 'पर्यावरण' ह्या विभागाचाही समावेश केला जाऊ लागला आहे खरा; पण, तो एक महत्त्वहीन विषय असतो : २०० पैकी १ वा २ पानं त्याला मिळतात. एवढ्या कमी पानांतूनही वनं, जमीन, पाणी, प्रदूषण, इ.ची दयनीय अवस्थाच पुढे येते; तथापि, ती अन्य पृष्ठांवर वर्णिलेल्या आर्थिक उपलब्धींशी कधीच जोडली जात नाही. ह्या 'उपलब्धीं'मुळे पर्यावरणावरचा आघात वाढला की कमी झाला ह्याचं विश्लेषण कुठेच नसतं. किंवा, पर्यावरणाच्या अवनतीची दखल भावी आर्थिक विकासाच्या दृष्टीनं घेतली गेली आहे, असंही होत नाही.

'धारणाक्षम विकासा'चा उद्घोष वारंवार केला जातो खरा; पण, आपण त्या ध्येयाच्या दिशेत पुढे जात आहोत का हे तपासण्यासाठी कोणतेही निकष नाहीत; ना कोणतेही निर्देशक.

**जागतिकीकरणाचा पर्यावरणाला काहीच लाभ झालेला नाही का?**

जागतिकीकरणाचे पर्यावरणाला अनेक लाभ झालेले आहेत. नवीकरणक्षम ऊर्जा, प्रदूषण-नियंत्रण, कार्यक्षमता-वृद्धी, इत्यादिसाठीची नवी तंत्रज्ञानं उपलब्ध झालेली आहेत; माहिती आणि संकल्पनांचं आदान-प्रदान संपर्क क्रांतीमुळे शक्य झालं आहे; पर्यावरणदृष्ट्या कमी हानीकारक तंत्रज्ञान वापरण्याची बड्या उद्योगांची क्षमता वाढलेली आहे.

असं असलं, तरी जागतिकीकरणाचे हे लाभ हे त्यामुळे झालेल्या हानीच्या पासंगालाही पुरत नाही. जे काही संकेत मिळत आहेत—संख्यात्मक वा गुणात्मक—ते सारे एकाच बाबीकडे निर्देश करतात : देशाचं पर्यावरण अधिकाधिक अ-धारणाक्षम बनत जाणं, आणि परिणामत: त्याच्या करोडो नागरिकांसाठी पार्यावरणिक असुरक्षितता वाढणं. नवीन तंत्रज्ञानामुळे पर्यावरणाची कोसळ फार तर पुढे ढकलली जाईल, एवढंच.

ह्या वाढीव कालावधीचा उपयोग एका वेगळ्या तऱ्हेच्या समाजरचनेकडे जाण्यासाठी आपण करून घेऊ शकतो का? कशी असेल ही समाजरचना? आर्थिक जागतिकीकरणाचा हा पर्याय कसा असेल?

*(क्रमशः)*

*ब्रिटनमधल्या ‘गार्डियन’ ह्या वृत्तपत्रानं निवडलेल्या पर्यावरण-रक्षकांचा परिचय*

# पर्यावरणाचे भाग्यविधाते २

**संतोष शिंत्रे**

### ५. मारियाना डी सिल्वा

ह्या ब्राझीलच्या माजी पर्यावरणमंत्री. (ऑक्टो. १४मध्ये त्या पंतप्रधानपदाची निवडणूक हरल्या.) त्यांच्या कठोर देखरेखीमुळे ब्राझीलमधल्या जवळजवळ ७५% जंगलांचा तोडीमुळे होऊ शकणारा विनाश थांबला. शिवाय, कैक दशलक्ष चौरस मैल इतकी राखीव जंगलं, त्या स्थानिक लोकसमूहांकडे सुपूर्त करू शकल्या. २००७मध्ये १५०० लाकूड-कापणी-उद्योगांवर छापे टाकून बेकायदा तोडलेलं १० लक्ष घनमीटर लाकूड त्यांनी जप्त केलं.

### ६. हेन्री सारागिह

इंडोनेशियाच्या सरकारबरोबर साटेलोटे करून, सुमात्रा आणि कालीमंटन येथील कैक लाख हेक्टरांवरच्या जंगलांची तोड करणाऱ्या ‘पाम तेल माफियां’शी टक्कर घेतलेला हा नेता. आज तो लाखों इंडोनेशियाई भूमिहीन मजुरांचा नेता तर आहेच; पण भू-सुधारणा, अन्नसुरक्षा ह्यांद्वारे पर्यावरणरक्षणाला कटिबद्ध असलेल्या ‘ला व्हिया कँपेसिना’ ह्या चळवळीचाही तो अध्यक्ष आहे. २० कोटी अल्पभूधारक, भूमिहीन आणि शेती/खाद्यान्न-उद्योगांत काम करणाऱ्या, ९०हून अधिक देशांमधल्या १८० संस्थांची ही चळवळ आहे. संयुक्त राष्ट्रसंघ, जागतिक बँक ह्यांच्या नव-वसाहतवादाला ‘ला व्हिया’ने चांगलेच आटोक्यात ठेवले आहे. सारागिहच्या मते इंडोनेशियातील १०० लक्ष हेक्टरांपेक्षा जास्त जंगलांचा पाम-लागवडीसाठी विनाश आणि तिथला कोळसा ढापणे हा एक ‘कॉर्पोरेट वसाहतवाद’ आहे. हेन्री त्याला सर्व शक्तीनिशी विरोध करतो आहे.

### ७. मास्सुमेह एबटेकर

इराणच्या उपाध्यक्षा आणि पर्यावरण मंत्री. अहमदनेजाद ह्यांच्या कारकीर्दीत पर्यावरणाचे प्रश्न पार अडगळीत पडले होते. इराणी शहरे खूप प्रदूषित झाली होती. एबटेकर बाईंनी अनेक हजार पर्यावरणसमूह उभे करून ह्याचा आणि अन्य अनेक पर्यावरण-प्रश्नांचा सामना करायला सुरुवात केली आहे. वन्यजीवन आणि तद्नुषंगिक प्रश्नांवर युरोपीय समूह आणि अमेरिकेचे सहकार्य मागून ते सोडवतानाच, पाश्चिमात्य जगाची इराण-बद्दलची अढीही त्यांनी मोठ्या कौशल्याने कमी केली आहे. पूर्वी अशीच मुत्सद्देगिरी इंदिराजींनी दाखवली होती.

### ८. डिएटर सॉलोमन

दक्षिण जर्मनीतील फ्रायबुर्ग शहराचे हे महापौर. हे छोटे गाव हे युरोपातील सर्वाधिक पर्यावरणस्नेही गाव समजले जाते, ते त्यांच्यामुळेच. अडीच लाख वस्तीचे हे गाव नुसतेच स्वत:ला ‘सौर प्रदेश’ म्हणवून घेत नाही; तर, संपूर्ण ब्रिटनइतकी सौर ऊर्जा आपल्या गावात ‘खेचते’. वर्षाकाठी फक्त एक आठवडा कृत्रिम उष्णता द्यावी लागेल अशी पर्यावरणस्नेही घरे इथे रोल्फ डिच नावाचा वास्तुविशारद बांधतो आहे. आणि ही उष्णतादेखील त्याच घरांच्या छपरांवरील सौर ऊर्जा-संकलकांद्वारे मिळवली जाते. २०१०मध्ये फ्रायबुर्गमध्ये वापरल्या गेलेल्या ऊर्जेच्या किमान १०% ऊर्जा ही नवीकरणक्षम होती. फ्रायबुर्गमधील एक तृतीयांश अंतरे लोक सायकली चालवून गाठू शकतात. गावात २०० मोटारींच्या पार्किंगची सोय आहे; तर ५००० सायकलींच्या पार्किंगची. इथे राहण्याचे पार्यावरणिक फायदे लोकांना जाणवल्यामुळे फ्रायबुर्गमध्ये सहजासहजी घर मिळत नाही.

(क्रमश:)

*स्वप्रयत्नांनी स्वास्थ्यप्राप्ती*

## स्वास्थ्यपंचक ३

# परिमितता

**ललिता रामचंद्र**

सृष्टीतील सर्व जीवांचे बीज पेरणारा साक्षात भगवंत आहे. भगवंत स्वत: म्हणतात : ‘अहं बीजप्रद: पिता।’ ते नेहमी उत्तम बीजच पेरतात. ह्या बीजाची काळजीपूर्वक जोपासना करून त्याचे रूपांतर सुदृढ, सक्षम मानवात करणे हे आपले काम असते. गर्भवती महिलांची योग्य काळजी घेतली तर मूल सुदृढ होते, हा साऱ्यांचाच अनुभव आहे. अशा सुदृढ शरीरातील सर्व संस्था योग्य प्रकारे कार्य करतात व तसे होते तेव्हाच स्वास्थ्यलाभ होतो. म्हणून भगवंताकडून लाभलेली ही सुदृढ, सक्षम यंत्रणा शेवटपर्यंत तशीच कार्यक्षम ठेवण्यासाठी जीवनात परिमितता हवी. जीवनात सर्वच गोष्टी प्रमाणात करायला हव्यात. ‘अति सर्वत्र वर्जयेत्’ हा मंत्र सतत स्मरणात व आचरणात ठेवायला हवा.

शरीर आणि जीवन ह्यांचा संबंध अतूट असल्याने शरीराची काळजी घेणे अनिवार्य आहे. म्हणून शरीर-धारणेसाठी, संवर्धनासाठी आवश्यक तो व आवश्यक तितका आहार नियमितपणे घ्यायला हवा. आपण आहार ‘कोणता’ घेतो हे फार महत्त्वाचे आहे आणि आपण आहार ‘किती’ घेतो हे त्याहून अधिक महत्त्वाचे आहे. म्हणून आहारात परिमितता असावी. शरीराच्या जरुरीपेक्षा जास्त आहार घेतल्यास पचनसंस्थेवर ताण येतो व पचन बिघडल्यास स्वास्थ्य बिघडतेच. म्हणून संयम—परिमितता—सोडून केवळ जिव्हालौल्यासाठी दिसेल ते, दिसेल तेव्हा, दिसेल तेथे आणि दिसेल तितके खाऊ नये. त्याचप्रमाणे आपल्या जरुरीपेक्षा कमीही खाऊ नये. निराहार, दीर्घकाळाचे उपवास टाळणेच योग्य.

आहाराप्रमाणे विहारही परिमित असावा. परिमित आहारातून निर्माण झालेली ऊर्जा दिवसभर पुरायला हवी. घरकाम, व्यवसाय, वैयक्तिक विकास, समाजकार्य ह्या जीवनावश्यक कार्यांसाठी ऊर्जा आवश्यक असते. म्हणून ह्या सर्व कामांत परिमितता ठेवून, संतुलन साधून कार्यरत राहावे आणि परिमित विश्रांतीही घ्यावी. काही माणसे जीवनात झपाटल्यासारखी कामे करतात. त्यातून जनकल्याणही साधतात. पण, सर्वांनाच तसे करता येत नाही. कारण, ती झपाटलेली माणसे कामाला वेळ मिळावा, ऊर्जा मिळावी म्हणून अनेक गोष्टींचा त्याग करतात, जो सर्वांना शक्य नसतो. किंबहुना तो करण्याची सर्वांची तयारीही नसते. करमणुकीचा त्याग करणे व कामातच आनंद मिळवणे किती जणांना आवडते? टीव्ही-कॉंप्यूटरसारख्या साधनांचा अतिरेकी वापर केवळ व्यक्तीचेच नव्हे तर कुटुंबाचेही स्वास्थ्य हिरावून नेत असल्याचे चित्र दिसू लागले आहे ना? म्हणून जीवनातील सर्वच गोष्टींचा विचार करून परिमितता आणायला हवी.

ही परिमितता सहजपणे स्वीकारली जात नाही. त्यासाठी विचार करायला लागतो आणि विचारांतही परिमितता ठेवून योग्य वेळीं योग्य तो निर्णय घ्यावा लागतो. काही माणसे सतत विचार करत राहतात : विचार थांबवून निर्णय कधीच घेत नाहीत. त्यामुळे कार्य होतच नाही. तसेच काही माणसे सतत कामच करत राहतात—विचार करतच नाहीत. सुखाच्या इच्छेने जिवापाड काम करून सुखसाधने जमवत राहतात. त्यांचा उपभोग घ्यायला तरी आपल्याला वेळ मिळतोय का, हा साधा विचारही ते करत नाहीत. म्हणून इच्छाही परिमित करून सुखसाधनांचा, धनाचा संग्रहही परिमित ठेवायला हवा. अर्थात परिमिततेसाठी मन:संयम आवश्यक आहे. इच्छा आणि आवश्यकता ह्यांतील फरक समजणे आवश्यक आहे आणि ते समजण्यासाठी स्वस्थ बसून विचार करणेही आवश्यक आहे. विचारधिष्ठित आचार ही स्वास्थ्याची गुरुकिल्ली आहे. ही गुरुकिल्ली आपल्यापैकी प्रत्येकाच्या हातात आहे, कारण, विचार आणि आचार हे दोन्ही आपल्या हातात आहेत. म्हणून वापरू या ही गुरुकिल्ली आणि होऊ या स्वस्थ.

(क्रमश:)

---

***स्वच्छता...*** (पृष्ठ १ वरून)

मानवी रचना ही ‘केंद्रीकरणा’वर आधारलेली आहे. म्हणजेच ती निसर्गाच्या पूर्णत: विरोधी आहे. अशा रचनेमध्ये संश्लेषण आणि विश्लेषण ह्या क्रियांमध्ये सामीप्य असूच शकत नाही. सेंद्रिय द्रव्यांची निर्मिती होते शेतांत वा फळबागांमध्ये; आणि त्याज्य द्रव्यांचे ढीग साठतात शहरांमध्ये. हे ढीग इतक्या मोठ्या प्रमाणात, आणि इतक्या प्रचंड वेगानं साठतात की, त्यांचं करायचं म्हटलं तरी विघटन करणं शक्य नाही. भाज्यांचे देठ, फळांची सालं, शिजलेलं अन्न, निर्माल्य, पालापाचोळा... प्रचंड प्रमाणात त्यांचे ढीग रोजच्या रोज तयार होतात. ‘डंपिंग ग्राउंड’वर ते नुसते ओतले जातात. त्यांचं विघटन होतच नाही. जी सेंद्रिय द्रव्यं विकेंद्रित स्वरूपात जमिनीवर पडली तर विघटित होऊ शकतात, ती केंद्रीकरणामुळे ‘अ-विघटनक्षम’ बनून जातात!

माझ्याकडे ‘न्यूजवीक’चा १९८९मधला एक अंक आहे. त्यात अमेरिकेतल्या एका शहराच्या ‘कचरा डेपो’चं प्रकाशचित्र आहे. ह्या कचऱ्याच्या ढिगाखाली १९५२मधलं एक वृत्तपत्र आणि मक्याच्या कणसाचं धाट सापडलं. त्या वृत्तपत्रातला बराचसा मजकूर १९८९मध्येही वाचता येत होता! १९५२मध्येच गाडलेलं ते कणसाचं धाटही जस्संच्या तस्सं होतं!—तो ‘कुजू शकणारा’ (degradable) कचरा ३५ वर्षं झाली तरी कुजला नव्हता!

ह्याचं कारण असं की, कुजण्याची क्रिया ही प्राणवायू असेल, तरच होऊ शकते. ती ‘aerobic’ असते. जर कचऱ्याचे ढीग रोज वर येऊन पडत राहिले, तर विघटकांना काम करण्यासाठी खाली हवा, प्राणवायू मिळणार कुठून?

शहरं नावाची एक अत्यंत अनैसर्गिक व्यवस्था आपण जोवर चालवत आहोत, (खरं म्हणजे लाखों कोटी रुपये ओतून ‘वाढवत’ आहोत) तोवर सेंद्रिय कचरा—विघटनक्षम असूनही—एक समस्याच बनून राहणार. ज्या बिंदूपाशी त्याचं संश्लेषण झालं, तिथे तो परत जाऊच शकणार नाही! त्या दोन स्थानांमधलं भौगोलिक अंतर इतकं प्रचंड असतं की, सेंद्रिय द्रव्यांचं चक्र पुरं होऊच शकणार नाही.

आपण सध्या हेच उद्योगीकरण, शहरीकरण ह्यांच्या वाढीसाठी भरघोस प्रयत्न करत आहोत, अन् तरीही म्हणे आम्ही ‘स्वच्छ भारत’ निर्माण करणार आहोत! निसर्गाच्या विरोधी वागून; Homo technicus आणि Homo economicus बनून आम्ही ज्या समस्या निर्माण केल्या आहेत, त्या तशा वागण्याचा अतिरेक करून म्हणे आम्ही सोडवणार आहोत!

(क्रमश:)

---

***छापील अंकाच्या वर्गणीदारांना ई-अंक विनामूल्य मिळतो. आपला ई-पत्ता कळवा.***

---

**रामायण...** (पृष्ठ ३ वरून)

सारी सजीव-निर्जीव भूते ही ह्या वृक्षाची पुष्पे-पत्रे-फळे होत’ असे म्हटले आहे (अयोध्याकांड ३३.१५). श्रीराम स्वत: ‘मी धनसंपदा-परायण नसून धर्मपरायणतेने लौकिक जीवन वसवू इच्छितो (लोकम् आवस्तुम् उत्सहे)’ असे म्हणतात (अयोध्याकांड १९.२०). श्रीरामांना जेव्हा वर मागण्याची संधी मिळाली, तेव्हा त्यांनी असुरांप्रमाणे अवध्यता, अजेयता, थोर शस्त्रे-अस्त्रे मागितली नाहीत. त्यांनी इंद्राकडे जखमी वानरवीरांसाठी व्रणविहीन, आरोग्यपूर्ण शरीर व सर्व ऋतूंमध्ये फळे देणारे वृक्ष मागितले. भरद्वाज मुनींकडे वर मागताना त्यांनी अयोध्येच्या चहू दिशांना तीन योजनांपर्यंत समृद्ध निसर्ग मागितला, निर्मळ नद्या मागितल्या. अयोध्येच्या ध्वजावर भरदार कोविदार वृक्षाचे चित्र असे; तर, रावणाच्या ध्वजावर माणसाच्या कवटीचे अभद्र चिन्ह होते. श्रीरामांच्या पर्यावरणीय व्यक्तित्वाचा हा एक भाग आहे. दुसरा भाग ते ज्या अयोध्यानिवासी समाजाचे प्रतिनिधित्व व स्वामित्व करतात, त्याच्या गुणांद्वारे व्यक्त होतो.

(क्रमश:)


आपली जीवनदृष्टीच जर मुळात चुकीची असेल, तर आपलं जीवनध्येयही चुकीचंच असणार, नि जीवनशैलीही.

ह्या तिन्हींचं योग्य स्वरूप पुढे ठेवून, जीवनाला योग्य आकार देण्यासाठी विचारप्रवृत्त आणि कार्यप्रवृत्त करणारी पुस्तिका

**आकार जीवनाला !**

*दिलीप व पौर्णिमा कुलकर्णी*

*पृष्ठे* : ५६; *किंमत* : रु.२०.

*पुण्यात उज्ज्वल ग्रंथ भांडार, अप्पा बळवंत चौक, इथे उपलब्ध.*

सं संतुलन प्रकाशन


## ग.सं.वार्ता

लातूर इथे आयोजिलेल्या निसर्गायण शिबिराला जोडून आधीचे २ दिवस तुळजापूर आणि लातूर इथं दिलीप आणि पौर्णिमा कुलकर्णी ह्यांची व्याख्यानं आयोजिलेली होती. दि. १६ला तुळजापूरला २ शाळांत; तर, दि. १७ला लातूरला दयानंद आणि शाहू ह्या दोन महाविद्यालयांत आणि नवभारत शाळेत ही व्याख्यानं झाली.

१७ला सायंकाळी लातूरच्या क्रीडा-संकुलाच्या प्रेक्षागृहातील परांजपे वाचनालयात ‘ह्या विकासाला उतारा...’ हा विकास- आणि पर्यावरण-विषयक काव्यांच्या वाचनाचा कार्यक्रम दिलीप आणि पौर्णिमा कुलकर्णी ह्यांनी सादर केला. ह्या कार्यक्रमाचं हे पहिलंच सादरीकरण होतं, नि लातूरकरांचा त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. पर्यावरणप्रेमी आणि वाचनालयाचे काही वाचक प्रथमपासून उपस्थित होतेच; पण, फिरण्याच्या व्यायामासाठी आलेले काही जणही काव्यवाचन ऐकण्यासाठी येऊन बसले. सर्वांत आश्चर्याची बाब म्हणजे हा कार्यक्रम आणि काव्यांतील विचार आवडून त्यांपैकी ४ जण दुसऱ्या दिवशीच्या निसर्गायण शिबिरात सहभागी झाले!

१८ला केशवराज विद्यालयात झालेल्या शिबिरात एकूण ४४ जण सहभागी झाले. ९॥ ते ५ ह्या वेळेत झालेल्या ह्या शिबिरात ७ व्याख्यानांमधून दिलीप व पौर्णिमा ह्यांनी विविध विषयांची मांडणी केली.

तुळजापूरचे अनिल चव्हाण आणि लातूरचे डॉ. श्रीरंग भुतडा हे २००८ मध्ये कुडावळ्यात झालेल्या तीन-दिवसीय शिबिरात सहभागी होते. त्यांनीच पुढाकार घेऊन बंडू सुगरे व राजेश व्यास ह्यांच्या सहकार्यानं ह्या सर्व कार्यक्रमांचं नेटकं आयोजन केलं होतं.

* * *

दि. १९ जानेवारीला पुण्यात ‘वसुंधरा चित्रपट महोत्सव’ आणि ‘महाराष्ट्र साहित्य परिषद’ ह्यांनी एक दिवसाचं पर्यावरणप्रेमी साहित्य संमेलन आयोजिलं होतं. त्या अंतर्गत दिलीप कुलकर्णी ह्यांची एक पत्रकार-परिषद आणि प्रकट मुलाखत झाली.

पुण्यातील हिंगण्याच्या ‘नित्यानंद सभागृहा’त समर्थ रामदास स्वामींच्या पादुकांचा जानेवारीत ५ दिवस मुक्काम होता. तिथे दि. २०ला दिलीप कुलकर्णी ह्यांचं ‘निसर्ग आणि अध्यात्म’ ह्या विषयावर प्रवचन झालं.

* * *

कराड, जि. सातारा येथील ‘कल्पना चावला विज्ञान केंद्र’ हे वर्षभर अनेक उपक्रम चालवत असतं. तिथे दि. १० फेब्रुवारी रोजी ‘ह्या विकासाला उतारा...’ हा काव्यवाचनाचा कार्यक्रम दिलीप कुलकर्णी ह्यांनी प्रस्तुत केला.

त्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी कोल्हापुरातील KIT अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी दिलीप कुलकर्णी ह्यांनी संवाद साधला; तर सायंकाळी गारगोटी, जि. कोल्हापूर येथील श्री शाहू वाचनालयात आयोजिलेल्या डॉ. आंबेडकर व्याख्यानमालेचं शेवटचं पुष्प त्यांनी गुंफलं. विषय होता : ‘विनाशाकडून विकासाकडे’.

***वर्गणी मनिऑर्डरने पाठवताना...***

- ❑ प्रत्येक वर्गणीदाराच्या नावाची ३०रु.ची स्वतंत्र म.ऑ. करावी.
- ❑ जुन्या वर्गणीदारांनी नावानंतर कंसात आपला पावती क्रमांक लिहावा.

## *'काय सोडणार' अभियान*

**वाचकांचा प्रतिसाद**

*कालिदास मराठे, फोंडा, गोंय* : ह्या अभियानास प्रतिसाद म्हणून मी टूथपेस्ट सोडण्याचे ठरविले आहे. ह्यापूर्वी मी थंड पेये, आईस्क्रीम, बिस्किटे आणि दाढीचा साबण ह्या वस्तू सोडल्या आहेत.

*प्रीती जोशी, पुणे* : मी वेष्टन असलेल्या ready made आणि ready to cook खाद्यपदार्थांना रामराम करण्याचा संकल्प करीत आहे. तसेच स्टायरोफोमच्या ताटातील खाद्ये व प्लॅस्टिकच्या पेल्यातील पेये सेवन न करण्याचेही मी ठरविले आहे.

*दिलीप व पौर्णिमा कुलकर्णी, कुडावळे* : बाजारात प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये व डब्यांमध्ये बंद केलेले तयार खाद्यपदार्थ आम्ही इत:पर घरी आणणं बंद करणार आहोत. (उदा. चिवडा, बाकरवाडी, लाडू, चिक्की, इ.) अपवाद : प्रवासात एखाद्या वेळी नाइलाज म्हणून असे पदार्थ विकत घ्यावे लागतील.

*इंग्रजी नियतकालिकांतील पर्यावरणविषयक लेखांचा सटीक परिचय*

# हिरवं वाचन

### अजित बर्जे

अस्ताव्यस्त पसरलेल्या महानगरांमध्ये आज पोटापाण्यासाठी स्थिरावलेला माणूस दिवसभरातील एका दुष्टचक्रात अडकलेला असतो. बस-ट्रेनचा प्रवास, वाहतुकीची कोंडी, प्रदूषण, मानसिक व शारीरिक ताण-तणाव अशा अनेक समस्या त्याला भेडसावत असतात. आयुष्य नीरस करणाऱ्या ह्या गोष्टींमधून काही काळ का होईना सुटका करून घेण्यासाठी व निखळ आनंद घेण्याच्या हेतूने तो घराच्या चार भिंतींबाहेर पडायला उत्सुक असतो.

काल-परवापर्यंत एका ठरावीक पठडीतील असलेले पर्यटन हे काळ व गरज बदलल्यावर इकोटूरिझम, ॲडव्हेंचर टूरिझम, स्पोर्टस् टूरिझम, कल्चरल टूरिझम, मेडिकल टूरिझम अशा नवनवीन अवतारांत आता स्थिरावू लागले आहे. त्यातील 'इको टूरिझम' ह्या प्रकाराचा सध्या सर्वांत जास्त बोलबाला आहे. ***टेरा ग्रीन*** मासिकाच्या नोव्हेंबर '१४च्या अंकात ह्याच विषयी जबाबदारीची जाणीव करून देणारा 'इकोलॉजिकली कॉन्शस् टूरिझम : ग्रोथ फ्रॉम निश् टू कमॉडिटी' हा लेख प्रसिद्ध झाला आहे.

पर्यटन-उद्योग हा आज जगातील सर्वांत मोठी उलाढाल असलेला व्यवसाय बनला आहे. आज जागतिक स्तरावर वाढती महागाई, बेकारी, बंद पडणारे उद्योग, युद्ध व अशांतता, आर्थिक मंदी ह्या व अशा समस्यांमध्येही केवळ तग धरून राहिलेलाच नव्हे, तर बहरणारा उद्योग म्हणून त्याकडे पाहिले जाते. ह्या उद्योगाचा आवाका व त्याचा सर्व नैसर्गिक संसाधनांतर पडणारा ताण ह्याचा अंदाज येण्यासाठी लेखामध्ये काही बोलकी आकडेवारी दिलेली आहे. आर्थिक महासत्तेच्या दिशेने प्रवास करणाऱ्या चीनच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाहून ह्या उद्योगाची उलाढाल मोठी आहे. 'वर्ल्ड ट्रॅव्हल व टूरिझम कौन्सिल'च्या दशकभरापूर्वीच्या आकडेवारीनुसार २३.५ कोटी व्यक्ती ह्या व्यवसायात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष गुंतलेल्या आहेत. ह्याचा अर्थ जगातील नोकरी-व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक १२ व्यक्तींतील एक ह्या व्यवसायाशी निगडित आहे. २००४ साली ह्या व्यवसायाची एकूण आर्थिक उलाढाल ५.५० महापद्म अमेरिकी डॉलर एवढी होती, जी आता कित्येक पट अधिक आहे. जागतिक स्तरावर ह्याचा आर्थिक वाढीचा दर ९.२% इतका आहे. जगातील तब्बल ६० देशांचे उत्पन्नाचे मुख्य साधन पर्यटन हे आहे. तसेच, १५० हून अधिक देशांच्या पहिल्या पाच प्रमुख उत्पन्न-स्रोतांमध्ये ह्याचा समावेश होतो. १९५०मध्ये पर्यटन करणाऱ्यांची जगातील एकूण संख्या २.५ कोटी होती; ती आज वाढून १०८७ अब्ज एवढी झाली आहे.

ह्या सर्व आकडेवारीमध्ये निसर्ग-पर्यटनाचा वाटा किती हा प्रश्न साहजिकच येतो. १९९०च्या दशकात जेव्हा ही संकल्पना जागतिक स्तरावर रूजू लागली, तेव्हा त्याच्या वाढीचा वेग विविध देशांमध्ये २० ते ३४% इतका होता. २००४ साली पर्यटनाच्या एकूण वाढीच्या वेगाच्या तुलनेत ह्याची वाढ तिप्पट होती; तर २०१२ मध्ये एकूण पर्यटन-उद्योगाच्या उलाढालीतील २५% वाटा इको-टूरिझमचा होता.

ही सर्व आकडेवारी त्या विषयाशी संबंधित लोकांसाठी ठीक असली, तरी सर्वसामान्यांना एखाद्या चित्रकाराच्या अमूर्त कलाविष्कारासारखी भासू शकते : जिथे प्रत्येक प्रेक्षक त्याच्या परीने त्या चित्राचा वेगवेगळा अर्थ काढतो. असे असले, तरी ह्या आकडेवारीमुळे पर्यावरणावर त्याचे कसे परिणाम होतात, हे समजून घेता येते. इथे सर्वांत मोठा प्रश्न उभा राहतो तो 'इको-टूरिझम'च्या व्याख्येचा. ह्या विषयी एकच एक अशी ठोस व्याख्या नसल्याने सुरुवातीला उल्लेख केलेल्या वा इतरही पर्यटन-प्रकारांतील नेमके 'निसर्ग-पर्यटन' कुठले हे ठरविणे अवघड जाते. तसेच, त्यामुळे निश्चित अशी धोरणे, कायदे व मार्गदर्शक तत्त्वेही अस्तित्वात नाहीत. शास्त्रीय परिभाषेत हे मांडता न आल्याने ह्याचा व्यापक स्तरावर काय परिणाम होतो हे समजून घेणे अवघड होते. कारण, एखादे कुटुंब वा समूह पर्यटन करतो, तेव्हा त्याचा पर्यावरणावरील प्रभाव नगण्य वाटू शकतो; पण, देश किंवा जागतिक पातळीवर जी उलाढाल होते त्याचा एकत्रित परिणाम केवळ प्रचंड नसून, दूरगामीही असतो. पर्यटन करणाऱ्या एखाद्या व्यक्तीची कृती ही निसर्गाच्या दृष्टीने जबाबदार, हितकारक व शाश्वत आहे का ह्याचे मापदंड काय? एक तर सदसद्विवेकबुद्धीने प्रत्येकाने हे ठरवायचे किंवा ते घटनात्मक करून कायद्याद्वारे ठरवायचे. आपल्या देशात किती कायदे पाळले जातात हा संशोधनाचा विषय असला, तरी त्यांद्वारे सरकार, हॉटेले, पर्यटनांचे आयोजक, गाईड व ह्या विषयांशी संबंधित इतर व्यक्ती ह्यांवर नीती-नियमांचे बंधन येऊन त्यांवर अंकुश ठेवता येईल. वेगाने वाढणाऱ्या ह्या पर्यटन-उद्योगामध्ये स्वयंप्रेरणेने, वा जबाबदारीने कृती करणारे पर्यटक कमी असले, तरी प्रबोधनाने ही संख्या वाढू शकते; व निश्चित धोरण असल्यास त्या प्रकारे निर्णय घेऊन नियोजन करता येऊ शकते.

पर्यटन हे केवळ मौजमजेसाठी न राहता त्या त्या परिसराची, तसेच पर्यावरणाची बूज राखणारे असावे. पाश्चात्त्य देशांतील पर्यटकांमध्ये ही जाणीव मोठ्या प्रमाणात दिसून येते. असे असले तरी ह्यामध्येही खूप मजल गाठायची बाकी असल्याची जाणीव लेखक करून देतो. बरेच पर्यटक निसर्गातील नाजूक परिसंस्थांना भेटी देण्यासाठी गर्दी करतात किंवा विविध प्राणी-पक्ष्यांच्या प्रजननकाळात त्या स्थळांना भेटी देऊन नैसर्गिक प्रक्रियेत बाधा आणतात. एखादे ठिकाण (उदा. कास पठार) अचानक प्रसिद्धीस येऊन अति गर्दीमुळे त्याच्या अस्तित्वासच धोका निर्माण होतो. इको टूरिझमच्या नावाखाली हॉटेले-रिसॉर्टसाठी व आर्थिक लाभासाठी तेथील परिसंस्था वेठीस धरल्या जातात. वाढत्या पर्यटकांमुळे स्थानिक भागात कचरा व पाण्याच्या समस्या निर्माण होतात; तसेच शांततेचा भंग होतो. स्थानिक लोक वा आदिवासी हे ही पर्यटकांच्या करमणुकीसाठी वा मौजमजेसाठी वेठीस धरले जातात.

मुळात जेव्हा हजारो मैलांचा विमानप्रवास करून वा शेकडो कि.मी.चा वाहन प्रवास करून पर्यटक देशाटनासाठी जातात, तेव्हा दुर्मीळ होत जाणाऱ्या व प्रचंड प्रदूषण करणाऱ्या इंधनाचा चुराडा झालेलाच असतो, आणि इको टूरिझमच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला गेलेला असतो. त्यामुळे 'पर्यटन' म्हणजे काय हेच मुळात ठरवायची वेळ आली आहे. लेखकाने 'इको टूरिझम'ची व्याख्या केली आहे ती अशी : 'स्थानिक नैसर्गिक परिसंस्थांचे, तसेच तेथील सभ्यता-परंपरांचे व इतर सजीवांचे संरक्षण करण्यास स्थानिकांना हातभार लावणारी व तेथील सामाजिक घडी विसकटणार नाही ह्याची काळजी घेणारी कृती म्हणजेच निसर्ग-पर्यटन.'

*आगामी कार्यक्रम*

**नागपूर**

**दि. ७ मार्च** : सायंकाळी 'ह्या विकासाला उतारा...' हा काव्यवाचनाचा कार्यक्रम आणि निसर्गायण मंडळातील सभासदांशी संवाद.

**दि. ८ मार्च** : स.९ ते सायं.५


**निसर्गायण शिबिर**

*संपर्क :*

रवी महाजन ९७६३३-२३३९३
हेमंत मोहरीर ९५६१०-८५९७७
प्राची माहूरकर ९८२३६-१२४६८

नवी आवृत्ती

### हरित साधक




ह्या पुस्तकाची पहिली आवृत्ती वर्षभरातच संपून, नुकतीच दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली आहे.

मुख्य प्रवाह हिमतीनं नाकारून त्यातून बाहेर पडलेल्या आणि निसर्गस्नेही जीवनाच्या वेगवेगळ्या वाटा चोखाळणाऱ्या व्यक्ती/परिवारांचा परिचय ह्या पुस्तकात करून दिलेला आहे.

*प्रकाशक* : राजहंस; *किंमत* : रु. १२०/-

## आता वाचन केलियाचे फळ...

**वेगळ्या विकासाचे वाटाडे** । दिलीप कुलकर्णी

'सम्यक् विकास'मध्ये मी विकासाच्या सम्यक् संकल्पनेची वैचारिक आणि व्यावहारिक मांडणी केली. पण, नंतर मला असं वाटलं की, ज्यांचे विचार वाचून, अभ्यासून माझी वैचारिक जडण-घडण झाली, त्या माझ्या गुरुंचे ते विचारही संकलित स्वरूपात वाचकांपुढे ठेवावेत. ह्या कल्पनेचा परिपाक म्हणजे हे पुस्तक. गांधीजी, शूमाखर, दीनदयाल उपाध्याय, फ्रिट्यॉफ काप्रा आणि हेझेल हेंडरसन ह्या ५ जणांचे विचार ह्या पुस्तकात संकलित केलेले आहेत. हे सर्व विचार अवतरण-चिन्हांत आहेत. त्यांना जोडणारं सूत्रमय निवेदन तेवढं माझं आहे. तुकोबा म्हणतात तशी—'फोडिले भांडार । धन्याचा हा माल । मी तो हमाल । भारवाही'—ही माझी फक्त हमाली आहे. पण, विचारांच्या ह्या हमालीनं अनेकांना विचारप्रवृत्त केल्याचे; अनेकांच्यात वैचारिक परिवर्तन घडवून आणल्याचे अनुभव गेल्या १४ वर्षांत आले आहेत. आपणही हा ग्रंथ वाचा आणि विकासाच्या वेगळ्या वाटा चालू लागा.

प्रकाशक : राजहंस प्रकाशन. आवृत्ती : चौथी. किंमत : रु.१५०/-

## ...क्रिया पालटे तत्काळ

**सौर दिनदर्शिका** — सौर फाल्गुन, शके १९३६ (फेब्रुवारी-मार्च २०१५)

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | १<br>फेब्रुवारी20 | २<br>21 |
| ३<br>22 | ४<br>23 | ५<br>24 | ६<br>25 | ७<br>26 | ८<br>27 | ९<br>28 |
| १०<br>1 | ११<br>2 | १२<br>3 | १३<br>4 | १४<br>5 | १५<br>6 | १६<br>7 |
| १७<br>8 | १८<br>9 | १९<br>10 | २०<br>11 | २१<br>12 | २२<br>13 | २३<br>14 |
| २४<br>15 | २५<br>16 | २६<br>17 | २७<br>18 | २८<br>19 | २९<br>20 | ३०<br>मार्च21 |

### गतिमान ☯ संतुलन

❑ फक्त एका वर्षाचीच वर्गणी स्वीकारली जाईल. ❑ वार्षिक वर्गणी टपालखर्चासह आहे. ❑ अंक दरमहा दि.२१ला पोस्टात टाकला जातो. महिना-अखेरपर्यंत तो न मिळाल्यास तशी पोस्टकार्डावरील तक्रार कुडावळ्यास पाठवा. प्रती शिल्लक असल्यास दुसरी प्रत पुढच्या अंकासोबत अवश्य पाठवली जाईल. ❑ जुन्या अंकांच्या प्रती शिल्लक नसतात. ❑ वार्षिक वर्गणी म.ऑ.ने कुडावळ्यास पाठवावी, चेक नकोत. ❑ वर्गणी पुण्यात उज्ज्वल ग्रंथ भांडार, अप्पा बळवंत चौक, येथे रोखीने भरता येते.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक व मालक दिलीप दत्तात्रय कुलकर्णी ह्यांनी स्मिता प्रिंटर्स, १०१९ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापवून घेऊन १ मेघदूत, स्नेहनगर, पुणे ४११०३० येथे प्रकाशित केले.
संपादक : दिलीप दत्तात्रय कुलकर्णी

पंजीकृत नियतकालिक (Registered Newspaper)

प्रेषण : स.प.महाविद्यालय, पुणे ४११०३०
डाकघरातून; दरमहा दि.२१ला

टपालाने सवलतीच्या दरात पाठवण्याचा परवाना क्र. : PCW/088/2015-2017

खाली चिकटवलेल्या आपल्या नाव-पत्त्याच्या चिठ्ठीवरचा कालावधी **फेब्रु.१५** असा नोंदलेला असेल, तर आपली वर्गणी ह्या अंकाबरोबर संपते. कृपया त्वरित नूतनीकरण करा.

पावती क्रमांक　　　　कालावधी पर्यंत

**प्रति**

**प्रेषक** : गतिमान संतुलन,
कुडावळे ४१५७१२,
ता. दापोली, जि. रत्नागिरी



पंजीकरण क्र. : MAHMAR/2002/12860
घोषणापत्र क्र. : PHM/SR/176/VIII/2002, दि.3/10/2002